रविवार दि. १४ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनहिता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## टेंभुर्णीला नगरपंचायत दर्जा न मिळाल्यास ग्रामपंचायत निवडणुकीवर बहिष्कार ; विशेष ग्रामसभेत गावकऱ्यांचा एकमुखी निर्धार

### ग्रामपंचायत नको, आता फक्त नगरपंचायतच हवी; जाफ्राबाद तहसील कार्यालयाला ठराव सादर, प्रशासनासमोर नवे आव्हान

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ आणि महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टेंभुर्णी गावात नगरपंचायतीच्या मागणीने आता निर्णायक वळण घेतले आहे. गावातील मूलभूत सुविधांचा अभाव, वाढती लोकसंख्या, अनियोजित विस्तार आणि रखडलेला विकास यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६ वर बहिष्कार टाकण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

शुक्रवारी आयोजित विशेष ग्रामसभेत ''टेंभुर्णीला नगरपंचायतचा दर्जा नव्हे, तर स्वतंत्र नगरपंचायतच हवी'' असा एकमुखी सूर उमटला. ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी शासनाने तातडीने नगरपंचायत घोषित न केल्यास आगामी निवडणूक प्रक्रियेत सहभागी न होण्याचा इशारा दिला. यासंदर्भातील अधिकृत ठराव



जाफ्राबाद तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

**आरक्षण सोडतीच्या सभेत विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी**

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या सदस्यपदांच्या आरक्षण सोडतीसंदर्भात विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, आरक्षणाच्या चर्चेपेक्षा गावाच्या विकासाचा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर आला.

ग्रामस्थांनी गावातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. ''समस्यांचे माहेरघर'' बनलेल्या टेंभुर्णीला आता ग्रामपंचायतीच्या चौकटीत विकास शक्य नसल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

**अनेक वर्षांपासूनची मागणी; प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित**

टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे *(पान २ वर)*

## जालना जिल्ह्यात वाळू माफियांवर पोलिसांचा मोठा प्रहार; २४ तासांत १.११ कोटींचा मुद्देमाल जप्त

### १६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल; ११ वाहने जप्त, ५१५ ब्रास अवैध वाळू हस्तगत; अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेत मोठी कारवाई केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या निर्देशानुसार ११ व १२ जून २०२६ रोजी विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत राबविण्यात आलेल्या या व्यापक मोहिमेत १६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून १ कोटी ११ लाख ८९ हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त



करण्यात आला आहे. तसेच ५१५ ब्रास अवैध वाळू, ११ वाहने आणि वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

अवैध खनिज उत्खनन आणि वाळू तस्करीमुळे शासनाचा महसूल बुडत असल्याने जिल्हा पोलीस प्रशासनाने या प्रकारांविरोधात कठोर भूमिका घेत सलग कारवायांचा धडाका लावला आहे. चंदनझिरा, घनसावंगी, अंबड, मंठा आणि तालुका जालना पोलीस ठाण्यांच्या हद्दीत या कारवाया करण्यात आल्या.

**चंदनझिरा हद्दीत अप्पर पोलीस अधीक्षकांची थेट उपस्थिती**

अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी स्वतः चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी उपस्थित राहून अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई केली. या मोहिमेत १७ लाख ५० हजार *(पान २ वर)*

## जालना एलसीबीची धडक कारवाई; चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त; विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

### अंबडमधील मोटारसायकल चोरीचा उलगडा; पुणे जिल्ह्यातील तीन वर्षांपूर्वीच्या चोरीचाही लागला छडा

**जालना । प्रतिनिधी**

जालना स्थानिक गुन्हे शाखेने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना महत्त्वपूर्ण यश मिळविले असून अंबड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करत दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या प्रकरणात एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून एकूण ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १२ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करीत होते. यावेळी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, अंबड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ४३१/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता () मधील चोरीस गेलेली होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. MH-14-HJ-0479) ही साडेसावंगी येथील एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने चोरी केली आहे.

माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ साडेसावंगी येथे जाऊन शोधमोहीम राबविली. संशयित बालकाचा शोध घेऊन त्याला पालकांच्या उपस्थितीत ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर करण्यात आलेल्या चौकशीत त्याने चोरीची मोटारसायकल स्वतःकडे असल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून सुमारे ५० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल जप्त केली.

**चौकशीत पुण्यातील चोरीचाही उलगडा**

प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी अधिक सखोल तपास सुरू ठेवला. यावेळी संबंधित बालकाने आणखी एका मोटारसायकल चोरीची कबुली दिली. त्याने सुमारे तीन वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हिरो होंडा कंपनीची लाल रंगाची फॅशन मोटारसायकल (क्र. MH-14-BY-7948) चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी याबाबत पडताळणी केली असता, सदर मोटारसायकल भोसरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ५४९/२०२३, कलम ३७९ भारतीय दंड संहिता () अंतर्गत चोरीस गेलेली *(पान २ वर)*

## जालना शहरातील भाजप-शिवसेना नगरसेवकांची बैठक महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी एकजुटीने संकल्प

**जालना -प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील भाजप व शिवसेनेच्या नगरसेवकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, आ.अर्जुनराव भाऊ खोतकर, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, उमेदवार सुहास सिरसाठ, भास्कर आंबेकर, महापौर वंदना ताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीला भाजप व शिवसेनेचे सर्व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी विधानपरिषद निवडणुकीची रणनीती, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील समन्वय आणि महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी आवश्यक नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी मार्गदर्शन करताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, ''ही निवडणूक केवळ उमेदवाराची नसून महायुतीच्या विचारांची आणि विकासाच्या राजकारणाची निवडणूक आहे. सर्व नगरसेवकांनी एकजुटीने काम करून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार सुहास सिरसाठ यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून महायुतीच्या विकासकामांची माहिती द्यावी आणि ही निवडणूक विक्रमी मताधिक्याने जिंकावी.

माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात संघटनात्मक बळावर भर देत सांगितले की, ''भारतीय जनता पार्टी आणि महायुतीची ताकद ही तळागाळातील कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी आहेत.

## महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम वेगात ; ग्राहकांना ४८ तासांची पूर्वसूचना

### अचूक बिलिंग, वीज वापरावर थेट नियंत्रण आणि सौरऊर्जा सवलतीचा लाभ; मीटर बदलण्याची प्रक्रिया पूर्णपणे मोफत

**जालना । प्रतिनिधी**

महावितरण कडून राज्यभर स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम गतीने राबविण्यात येत असून, ज्या ग्राहकांकडे अद्याप पारंपरिक वीज मीटर आहेत, त्यांना मीटर बदलाबाबत पूर्वसूचना देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. भारत सरकारने १७ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेनुसार वीज वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी स्मार्ट मीटर प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येत आहे.

महावितरणकडून ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या संदेशानुसार, संबंधित ग्राहकांचे विद्यमान मीटर ४८ तासांनंतर बदलून त्याजागी स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत. या प्रक्रियेसाठी ग्राहकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून मीटर बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया मोफत असेल.

**स्मार्ट मीटर म्हणजे काय?**

स्मार्ट मीटर हे डिजिटल

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक वीज मीटर असून ते वीज वापराची माहिती स्वयंचलितपणे वीज वितरण कंपनीपर्यंत पोहोचवतात. त्यामुळे मीटर रीडिंग घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता राहत नाही. ग्राहकांना होणारे प्रमुख फायदे महावितरणच्या माहितीनुसार स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

**मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक व पारदर्शक बिलिंग.**

मोबाईल ॲपच्या माध्यमातून दररोजचा वीज वापर पाहण्याची सुविधा.

वीज वापराचे नियोजन करून बिलावर नियंत्रण ठेवण्याची संधी.

सौरऊर्जा उपलब्ध असलेल्या वेळेत घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८५ पैशांपर्यंत सवलतीचा लाभ.

**वीज वापराबाबत रिअल-टाइम माहिती उपलब्ध होणार**

*(पान २ वर)*

## रोटरी क्लब मिडटाउनतर्फे नाव्हा चौफुलीचा कायापालट

### दुभाजकांची दुरुस्ती, रंगरंगोटीसह झेब्रा क्रॉसिंग आणि अत्याधुनिक सुरक्षा साधनांची उभारणी

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरानजीकच्या दत्ताश्रम रोडवरील नाव्हा चौफुलीवरील वाहनांच्या वाढत्या वर्दळीमुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनने रस्ता सुरक्षेसाठी रोड सेफ्टी ड्राईव्ह हा उपक्रम राबवून दुभाजकांची दुरुस्ती, रंगरंगोटीसह झेब्रा क्रॉसिंग, चारही बाजूने रस्त्यालगत स्वच्छता आणि अत्याधुनिक सुरक्षा साधनांची उभारणी करून या चौफुलीचा कायापालट केला.

रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, रोटरी फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. भारत पंड्या, रोटरी ग्लोबल ग्रँटचे वरिष्ठ समन्वयक नेल्सन अब्राहम,





रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल संजय राठी, कन्वेनर अरुण अग्रवाल, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, क्लबचे अध्यक्ष अंकित अग्रवाल, प्रकल्प प्रमुख दिनेश छाजेड, करण अग्रवाल, डॉ. अनुप करवा, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, सदर बाजार ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. उनवणे, सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते फीत कापून या सुरक्षा प्रकल्पाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले.

हा उपक्रम केवळ औपचारिक उद्घाटनापुरता मर्यादित न ठेवता, रोटरी क्लब मिडटाउनने प्रत्यक्ष मैदानावर उतरून नाव्हा चौफुली



परिसरात अपघातांना कारणीभूत ठरणारे धोके दूर केले. त्यात प्रामुख्याने चौफुलीवर अनेक दिवसांपासून मोडकळीस आलेल्या दुभाजकांची तातडीने दुरुस्ती करण्यात आली आणि स्पष्ट दिसेल अशी आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली. वाहनचालकांना रात्रीच्या वेळी रस्ता स्पष्ट कळावा यासाठी थर्मो प्लास्टिक पट्ट्या, झेब्रा क्रॉसिंग, रिफ्लेक्टर आणि कॅटाईज बसवण्यात आले आहेत, ज्यामुळे रात्रीचे अपघात रोखण्यास मोठी मदत होईल. चौफुलीवरील रस्त्याच्या चारही बाजूंनी सखोल साफसफाई करण्यात आली. यामुळे आता येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहनचालकांना समोरील वाहने अगदी *(पान २ वर)*

## पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी बुथ प्रमुखांनी प्रयत्न करावेत - जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे

### परतुर - मंठा, परतुरसह नेर - सेवली येथे बुथप्रमुखांच्या बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**मंठा -योगेश राठोड**

शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करण्यासह मतदार यादी पुनर्विलोकन करण्याच्या दृष्टीने बूथप्रमुखांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांनी केले.

परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील मंठासह परतुर, नेर - सेवली येथे बूथप्रमुखांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाप्रमुख श्री बोराडे बोलत होते. या बैठकीला शिवसेना उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, उद्योग सेनेचे जिल्हाप्रमुख प्रल्हादराव बोराडे, माजी सभापती संतोष वरकड, परतुर



तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, धनंजय पोहेकर, अरुण उफाड, अशोक भागडे, प्रल्हाद खेडेकर, तुळशीराम कोहिरे, संदीप राठोड, प्रदीप ठोके, शरद भारुका, चैतन्य ठोंबरे, गोरख वटाणे, सचिन डवले, रमेश आकात, संजय कुकडे, अशोक सोळंके, आनंद वाकळे, नितीन राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने '' जेथे बुध मजबूत तेथे पक्ष मजबूत '' या संकल्पनेनुसार प्रत्येक बूथप्रमुखांनी आपल्या मतदान केंद्रावरील नवीन मतदार नोंदणीसह दुबार मतदार, नावामधील दुरुस्ती, स्थलांतरित व मयत मतदारांची नावे वगळणे या प्रक्रियांवर विशेष भर देऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करावे असे आवाहन जिल्हाप्रमुख *(पान २ वर)*

## संपादकीय...

# वारंवार बदल्या की प्रामाणिकतेची किंमत?

महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत काही अधिकारी त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नेहमीच चर्चेत राहतात. त्यापैकी तुकाराम मुंढे हे एक महत्त्वाचे नाव आहे. कठोर निर्णयक्षमता, नियमांची काटेकोर अंमलबजावणी आणि राजकीय वा प्रशासकीय दबावाला बळी न पडण्याची प्रतिमा यामुळे मुंढे यांनी राज्यभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रत्येक बदलीनंतर जनतेत, सामाजिक संघटनांमध्ये आणि राजकीय वर्तुळात चर्चा रंगते. जालना येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे शहर उपाध्यक्ष तय्यब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली मागणी ही केवळ एका अधिकाऱ्याच्या समर्थनापुरती मर्यादित नाही. या निवेदनातून प्रशासनातील स्थैर्य, प्रामाणिक अधिकाऱ्यांचे संरक्षण आणि शासनाच्या कार्यपद्धतीबाबत काही मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा समोर आले आहेत. प्रशासकीय सेवेत कोणत्याही अधिकाऱ्याला परिणामकारक काम करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक असते. एखाद्या विभागातील समस्या समजून घेणे, धोरणे आखणे आणि त्यांची अंमलबजावणी करून परिणाम दिसण्यासाठी वेळ लागतो. वारंवार बदल्या झाल्यास अधिकारी कितीही सक्षम असला तरी त्याच्या कामाची सातत्यपूर्ण फलश्रुती दिसून येणे कठीण होते. त्यामुळे बदल्या हा प्रशासनाचा अधिकार असला तरी त्या केवळ नियमित प्रक्रियेपुरत्या मर्यादित राहाव्यात की त्यामागे कार्यक्षमतेचे मूल्यांकन असावे, हा प्रश्न उपस्थित होतो.

अन्न व औषध प्रशासन विभाग हा थेट जनतेच्या आरोग्याशी संबंधित आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांविरोधातील कारवाई ही केवळ कायदेशीर बाब नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत कठोर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना कामासाठी आवश्यक स्वातंत्र्य आणि स्थैर्य मिळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कारवाईचे परिणाम, आकडेवारी आणि वस्तुस्थिती यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापनही तितकेच महत्त्वाचे आहे. तुकाराम मुंढे यांच्याबाबत जनतेत सकारात्मक भावना असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. मात्र लोकशाही व्यवस्थेत व्यक्तीपेक्षा व्यवस्था अधिक महत्त्वाची असते. त्यामुळे एखादा अधिकारी सक्षम असेल तर त्याला पुरेसा कार्यकाळ देण्याची आणि त्याच वेळी त्याच्या कामाचे पारदर्शक मूल्यमापन करण्याची यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान !

## जागतिक रक्तदाता दिनानिमित्त विशेष लेख

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅंडस्टेनर यांनी एबीओ हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो.

अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे.

भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२२५४६२९५**

# पान १ व ४ चार वरुन...

### टेंभुर्णीला नगरपंचायत...

नगरपंचायतीमध्ये रूपांतर व्हावे, यासाठी यापूर्वी अनेक वेळा ग्रामसभा आणि ग्रामपंचायत बैठकीत ठराव मंजूर करण्यात आले आहेत. संबंधित सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून प्रस्ताव वरिष्ठ कार्यालये तसेच मंत्रालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

मात्र, प्रस्ताव सादर होऊनही शासन स्तरावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळेच आता निवडणूक बहिष्काराचा निर्णय घेण्याची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**ग्रामस्थांच्या भावना वरिष्ठांकडे पोहोचणार**

विशेष ग्रामसभेत मंजूर झालेला ठराव ग्रामसंसद कार्यालयाचे प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) जगदीश आढाव यांनी पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ स्तरावर पाठविला आहे.

हा ठराव पुढील अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे :

जिल्हाधिकारी, जालना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना तहसीलदार, जाफ्राबाद गटविकास अधिकारी, पंचायत समिती जाफ्राबाद ''नगरपंचायतमुळे विकासाला गती मिळेल'' सामाजिक कार्यकर्ते जनार्दन झोरे यांनी सांगितले की, टेंभुर्णीची लोकसंख्या, बाजारपेठेचा विस्तार आणि वाढत्या नागरी गरजा लक्षात घेता नगरपंचायत ही काळाची गरज बनली आहे.

त्यांच्या मते, नगरपंचायतीकडे ग्रामपंचायतीपेक्षा अधिक निधी, व्यापक अधिकार आणि नियोजनबद्ध विकासाची क्षमता असते. नगरपंचायत प्रशासनाची जबाबदारी वर्ग-२ दर्जाच्या अधिकाऱ्याकडे असते. त्यामुळे निधीचा वापर नियमबद्ध पद्धतीने होतो आणि विकासकामांमध्ये अधिक पारदर्शकता राहते. ''टेंभुर्णीला फक्त नगरपंचायतीचा दर्जा नको, तर स्वतंत्र नगरपंचायतच झाली पाहिजे. गावाच्या भविष्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे.''

**जनार्दन झोरे, सामाजिक कार्यकर्ते**

''गावाचा कारभार दबावाखाली चालतो''

लहू शास्त्र सेनेचे शेख युसूफ यांनीही ग्रामसभेत तीव्र भूमिका मांडली. त्यांनी गावातील विकास नियोजनावर काही मोजक्या व्यक्तींचा प्रभाव असल्याचा आरोप केला.

''गावातील विकासाची धोरणे काही व्यक्तींच्या प्रभावाखाली ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. विकास प्रक्रियेत पारदर्शकता आवश्यक आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपंचायत हा एकमेव पर्याय आहे.''

**शेख युसूफ, लहू शास्त्र सेना**

प्रशासनासमोर मोठे आव्हान

टेंभुर्णी हे जाफ्राबाद तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र मानले जाते. अशा परिस्थितीत संपूर्ण गावाने निवडणुकीवर बहिष्कार टाकल्यास जिल्हा प्रशासन आणि राज्य निवडणूक आयोगासमोर मोठे आव्हान उभे राहू शकते.

नगरपंचायतीच्या मागणीवर शासन आणि प्रशासन कोणती भूमिका घेते, तसेच लोकप्रतिनिधी या प्रश्नावर काय पुढाकार घेतात, याकडे आता संपूर्ण जाफ्राबाद तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**टेंभुर्णीच्या प्रमुख मागण्या**

टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करावे नागरी सुविधांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करावा

रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध काम करावे नगरपंचायत स्थापन करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा मागणी मान्य न झाल्यास ग्रामपंचायत निवडणूक २०२६ वर बहिष्कार

### रोटरी क्लब मिडटाउनतर्फे...

रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कारवाई केल्याने वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली.

**घनसावंगीत हायवा टिप्पर पकडला**

स्थानिक गुन्हे शाखा, जालना आणि घनसावंगी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत भेंडाळा शिवारात विनापरवाना वाळू वाहतूक करणारा भारत बेंझ कंपनीचा हायवा टिप्पर (-२१--५४५५) पकडला. या कारवाईत सुमारे २० लाख रुपये किमतीचा हायवा व २५ हजार रुपये किमतीची वाळू असा एकूण २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित वाहन चालक आणि मालकाविरुद्ध खनिज व महसूल कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अंबड पोलिसांची कारवाई**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करून सुमारे १५ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**मंठा पोलिसांची पहाटेची धडक; ९ ट्रॅक्टर जप्त**

मंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खोरावड शिवारातील पूर्णा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा व वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार १२ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास विशेष पथकाने छापा टाकला.

या कारवाईत महिंद्रा, स्वराज आणि आयशर कंपनीचे एकूण ९ ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त करण्यात आले. जप्त वाहनांची आणि वाळूची एकूण किंमत ६३ लाख १० हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी ११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**तालुका जालना हद्दीत १५० ब्रास वाळू जप्त**

तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध वाळू उपशाविरोधात मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अंदाजे १५० ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून सुमारे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**कारवाईची ठळक आकडेवारी**

- एकूण आरोपी : १६
- एकूण जप्त वाहने : ११
- १ हायवा टिप्पर
- १ ट्रॅक्टर (विना क्रमांक)
- ९ ट्रॅक्टर-ट्रॉली
- एकूण जप्त वाळू : ५१५ ब्रास
- एकूण जप्त मुद्देमाल : ₹१,११,८९,००० पेक्षा अधिक

**अवैध खनिज वाहतुकीविरोधात मोहीम सुरूच राहणार**

जिल्ह्यातील नदीपात्रांमधून होणारा अवैध वाळू उपसा आणि खनिज वाहतूक रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून अशा कारवाया आणखी तीव्र करण्यात येणार असून नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाच्या या धडक मोहिमेमुळे अवैध वाळू तस्करी करणाऱ्या टोळ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून, पुढील काळात अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### महावितरणकडून...

ग्राहकांमध्ये मिश्र प्रतिक्रिया

स्मार्ट मीटर योजनेमुळे वीज वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता वाढणार असल्याचा दावा महावितरणकडून करण्यात येत असला तरी काही भागांमध्ये ग्राहकांकडून शंका आणि प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. विशेषतः स्मार्ट मीटरमुळे वीज बिलांवर काय परिणाम होईल, प्रीपेड प्रणाली लागू होणार का, तसेच तांत्रिक अडचणी उद्भवल्यास काय उपाययोजना असतील याबाबत नागरिकांकडून माहितीची मागणी होत आहे.

**महावितरणचे आवाहन**

मीटर बदलण्याची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी ग्राहकांनी अधिकृत कर्मचारी किंवा नियुक्त प्रतिनिधींना सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. तसेच ज्या ग्राहकांचे मीटर यापूर्वीच बदलण्यात आले आहेत किंवा बदलण्याची प्रक्रिया सुरू आहे, त्यांनी हा संदेश दुर्लक्षित करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**ऊर्जा क्षेत्राच्या आधुनिकीकरणाकडे महत्त्वाचे पाऊल**

देशातील वीज वितरण व्यवस्थेला डिजिटल स्वरूप देणे, वीज चोरी रोखणे, अचूक बिलिंग सुनिश्चित करणे आणि ग्राहकांना अधिक सक्षम सेवा उपलब्ध करून देणे या उद्देशाने केंद्र सरकार व राज्यातील वीज वितरण कंपन्या स्मार्ट मीटर प्रकल्प राबवत आहेत. आगामी काळात राज्यातील लाखो ग्राहकांचे पारंपरिक मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### रोटरी क्लब...

स्पष्टपणे दिसू शकतील. प्रास्ताविकपर भाषणात क्लबचे अध्यक्ष अंकित अग्रवाल म्हणाले की, नाव्हा चौफुलीवरून दररोज किमान ३ हजार वाहनांची वर्दळ असते. त्यादृष्टीने आम्ही सुरक्षा ड्राईव्ह हा उपक्रम राबविला आहे. यासाठी पोलीस आणि वन संरक्षक विभागाचे सहकार्य लाभले आहे. या प्रकल्पामुळे निश्चितच अपघात आणि जीवितहानीचे प्रमाण कमी होईल, असा आम्हाला विश्वास आहे. रिफ्लेक्टर्स, सुरक्षा साधनांची उभारणी हा अपघात टाळण्याच्यादृष्टीने अत्यंत शास्त्रीय व महत्त्वाचा उपाय ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रकल्प प्रमुख दिनेश छाजेड म्हणाले की, याच मार्गावर दत्ताश्रम, माळाचा गणपती मंदिर, जैन मंदिर असून हजारो भाविकांची नेहमी वर्दळ असते. याशिवाय बाहेरगावी जाण्यासाठी हा अत्यंत महत्वपूर्ण चौक आहे. या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी राबवलेला रस्ता सुरक्षा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल. डॉ. भारत पंड्या म्हणाले की शासन, समाज घटक मिळून जनसमान्यांसाठी जेव्हा काम करतो तेव्हा चांगले काम होते, त्याचे हा प्रकल्प उत्कृष्ट उदाहरण आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी या हा अभिनव उपक्रम आहे अशा शब्दात रोटरीचे कौतुक केले. ते म्हणाले की, अशा उपक्रमातून आपण चांगली वाटचाल करू शकतो. जालन्याचे नागरिक, व्यावसायिक, उद्योजक व रोटरीसारख्या संस्था मदतीसाठी सदैव अग्रेसर असतात. रोटरी क्लबने प्रत्यक्ष कामातून दाखवून दिलेली ही तत्परता इतर संस्थांसाठीही आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि जालना पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार करण अग्रवाल यांनी मानले.

### पक्षाची संघटनात्मक...

श्री बोराडे यांनी केले. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये त्यासाठी बूथ प्रमुखांनी घरोघर जाऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवावी असे सांगितले. या बैठकांना उपतालुका प्रमुख, विभागप्रमुख, उपविभाग प्रमुख, बूथप्रमुख, शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालना एलसीबीची...

असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर ही मोटारसायकल देखील जप्त करण्यात आली.

**दोन्ही दुचाकी अंबड पोलीस ठाण्यात जमा**

तपासादरम्यान जप्त करण्यात आलेल्या दोन्ही मोटारसायकली पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी अंबड पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे अंबडमधील अलीकडील मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला असून, पुणे जिल्ह्यातील जुन्या चोरीच्या गुन्ह्याचाही छडा लागला आहे.

**एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत दोन चोरीच्या मोटारसायकलींसह एकूण ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना मिळालेल्या या यशामुळे मोटारसायकल चोरीच्या घटनांवर अंकुश बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही यशस्वी कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि अंबड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, सॅम्युअल कांबळे, विजय डिक्कर, प्रशांत लोखंडे, देविदास भोजने, शिवकुमार एकंडे, सतीश श्रीवास, सागर बाविस्कर, दत्ता बाघुंडे, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर, योगेश सहाने आणि चालक अशोक जाधवर यांनी सहभाग घेतला.

**चोरीच्या गुन्ह्यांच्या तपासात LCB ला यश**

जिल्ह्यात वाढत्या वाहन चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत केलेल्या तपासातून दोन वेगवेगळ्या चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्याने पोलिसांना महत्त्वाचे यश मिळाले असून, चोरीच्या इतर गुन्ह्यांचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### उन्हाची दाहकता ...

तीव्रतेमुळे विदर्भातील शाळा २२ जून रोजी उघडत आहे. याशिवाय २२ जून ते ३० जून पर्यंत त्या शाळा सकाळ सत्रात घेण्याचे सुचविले आहे. जालना जिल्हा हा विदर्भाला लागूनच असल्याने इकडेही उन्हाची दाहकता तीव्र आहे. शिवाय अद्याप पाऊसही पडलेला नाही. त्यामुळे पत्राच्या खोल्यात बसणे विद्यार्थी व शिक्षकांना असाहाय्य होणार आहे. यामुळे विदर्भाप्रमाणे जिल्ह्यातील शाळा ही एकतर उशिरा सुरू कराव्यात किंवा सकाळ सत्रात तरी भरवाव्यात. डॉ.. रवींद्र काकडे, जिल्हाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, जालना फोटो - प्राथमिक शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांना निवेदन देताना अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा पदाधिकारी.

### विमान कंपनीचा...

या महत्त्वपूर्ण निकालावर बोलताना, जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ''राज्य ग्राहक आयोगाचा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि ग्राहक हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. प्रवाशांना पूर्वसूचना न देता फ्लाईटची वेळ बदलणे, ही एक गंभीर आणि अक्षम्य चूक आहे. या निकालामुळे इतर कंपन्यांनाही एक कठोर संदेश मिळेल. मी सर्व ग्राहकांना आवाहन करतो की, आपल्या हक्कांसाठी नेहमी जागरूक रहा आणि कोणतीही सेवा कंपनी तुमच्याशी अन्यायकारक वागत असेल, तर न घाबरता ग्राहक आयोगाकडे दाद मागा. कायद्याने तुम्हाला दिलेले हक्क मिळवण्यासाठी लढा देणे आवश्यक आहे.'' ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, ''अनेकदा ग्राहक लहान रक्कम किंवा कायदेशीर प्रक्रियेच्या त्रासामुळे तक्रार करणे टाळतात. परंतु, हा निकाल दर्शवितो की, कायद्याच्या चौकटीत राहून लढा दिल्यास न्याय नक्कीच मिळतो. ग्राहकांनी अशा घटनांची माहिती त्वरित संबंधित प्राधिकरणाला द्यावी आणि कायदेशीर सल्ला घ्यावा. यामुळे केवळ त्यांनाच न्याय मिळत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यास मदत होते. प्रत्येक ग्राहकाने आपला हक्क बजावल्यास कंपन्यांच्या मनमानी कारभाराला नक्कीच आळा बसेल.''

अखेरीस, राज्य आयोगाने जिल्हा आयोगाच्या निर्णयात बदल करत आपला अंतिम निकाल दिला. आयोगाने टाटा एसआयए एअरलाइन्सला तक्रारदारांना ५८,६४१ रुपये ९% व्याजासह परत करण्याचे निर्देश दिले. याशिवाय, मानसिक आणि शारीरिक त्रासासाठी ५०,००० रुपये आणि खटल्याच्या खर्चापोटी १५,००० रुपये देण्याचे आदेश दिले. हा निकाल ग्राहक हक्कांच्या लढाईत एक मैलाचा दगड मानला जात आहे.

### शेख मोहसीन...

पीडित कुटुंबाला न्याय मिळावा आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखी मागणी प्रशासनाकडे केली.

खटला जलदगती न्यायालयात चालवावा, तपास जालना स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावा तसेच पीडित पक्षासाठी ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय शहरात पोलीस गस्त वाढविणे व प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची मागणीही करण्यात आली.

# नेशन बिल्डरगृहिणी !

कधी काळी मातृसत्ताक राज्य पद्धती असलेला आपल्या देशात काळाच्या ओघात पुरूषप्रधान संस्कृतीचा शिरकाव झाला आणि सर्वत्र पुरूषसत्ताक कुटुंब व्यवस्था रूळली आणि रूजली. नंतरच्या काळात स्त्रियांना बरोबरीचा दर्जा राहीला नाही. जगभरात स्त्रियांना आपल्या हक्कासाठी आंदोलन करावी लागली. आपल्या देशात संविधानाने समान हक्क मान्य केला असला तरी आज समान वागणूक हा प्रश्न आहे. सोबत महिला मुक्ती तसेच महिला तसेच महिला सबलीकरण यावर देखील चर्चा होते. या बाबत सर्वोच्च न्यायालयाने एका अपघात विमा प्रकरणात ऐतिहासिक निवाडा दिला आहे तो महत्वाचा आहे. याद्वारे महिलांना गृहिणी न म्हणता राष्ट्र निर्मितीमधील एक व्यक्ती म्हणून मान्यता द्यावी असे भाष्य केले आहे.

साधारणपणे गृहिणीचे स्थान घराघरात रांधा-वाढा-उष्टी काढा इतपत मानले जाते. ती गृहिणी व्यक्ती म्हूणन जगताना जी विविध नाती जपते आणि त्या निमित्ताने जे कष्ट उपसत असते त्याचे मोल केले जात नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही. ''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी'' असं आपण म्हणतो तर दुसरीकडे मुलगी शिकली प्रगती झालीअसही सांगतो. सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिला त्याचा संदर्भ अपघात विमा दाव्याशी संदर्भ ठेवून आहे. घरातील एखादा कर्ता पुरूष अपघातात मरण पावला तर त्याचं वय, कमाई आणि अपेक्षित जीवनमान याच्या आधारे भरपाईची रक्कम ठरविली जाते. अपघातात मरण पावलेली माहिला कमावती नसेल आणि ती केवळ गृहिणी असेल तर भरपाईचे मोजमापच नाही. म्हणूनच हा निवाडा महत्वाचा आहे.

घरात असणारी सर्व प्रकारची कामे, तसेच मुलांचे संगोपन, शिक्षण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्कार देण्यात गृहिणीचा मोठा वाटा असतो. पुरूषाने फक्त नोकरी-व्यवसाय करुन कुटूंबाच्या निर्वाहासाठी पैसा कमावणं इतकच आपला समाज मानतो. घरातील या कामांसाठी महिलांना पत्नी म्हणून पगार देणारा पती हा प्रकार आपल्याकडे नाही. त्यामुळे गृहिणी म्हणून ती व्यक्ती, ती स्त्री, आपल सर्वस्व झोकून देऊन नवी पिढी घडवत असते. प्रसंगी स्वतः उपाशी राहून मुलांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करते. या अर्थाने ती नवी पिढी घडविण्याचे राष्ट्रीय कार्य करते. म्हणून तीला नेशन बिल्डर चा दर्जा असावा असे निरीक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

आपण जर आपल्या आयुष्यात जरा वळून बघितल तर जानवेल की ती गृहिणी म्हणून घरात वावरताना पत्नी, सून, आई, या विविध नात्यांची गुंफण जपत स्वतःची पर्वा न करता आणि कोणत्याही आभाराची अपेक्षा न करता राबते आणि अगदी घरातील व्यक्ती म्हणून वावरताना ती सतत टोमणे सहन करीत असते. मुलं देखील हॉटेलमध्ये ऑर्डर द्यावी तशी खाण्यासाठी ''ऑर्डर'' सोडतात. हे घराघरातल चित्र आहे. नाही म्हणायला तिचा मोठेपणा मिरवायला हल्ली ग्रिटींग कार्ड, केक आिा पार्टीच्या माध्यमातून मदर्स डे साजरा केला जातो.

घरातील स्त्रिया माता म्हणून मिळणारा मान वगळता इतर बाबतीत तिचं आणि तिच्या कामाचं महत्व दुर्लक्षित होत. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीवर सर्व अवलंबून असतात असे नव्हे तर कुटुंबातील कमावत्या सदस्यासोबतच सारं कुटुंब तिच्यावर अवलंबून असतं म्हणून ती नेशन बिल्डर.

मातृ देवो भव म्हणायचं, सण, उत्सवात दुर्गा व इतर देवींची पुजा करतो मात्र घरातलं दैवत वंचित राहतं. न्यायालयाच्या या निर्णयानं या निमित्तानं एक नवा विचार समोर आणला आहे आणि सह सर्वांनाच तो मान्य असावा.

**- प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

# पाण्याने पेटला वणवा ऐतिहासिक मराठी नाटक लवकरच इतिहासाचा प्रेरणादायी संघर्ष रंगभूमीवर




आज आपण सहजपणे पाणी पितो. मात्र, एक काळ असा होता की केवळ जन्माच्या आधारावर लाखो लोकांना सार्वजनिक पाण्यालाही स्पर्श करण्याचा अधिकार नव्हता. त्या सामाजिक अन्यायाविरुद्ध २० मार्च १९२७ रोजी महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळे सत्याग्रह उभारला. हा संघर्ष केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवी प्रतिष्ठा, समानता आणि स्वाभिमानासाठी पेटलेला लढा होता. या ऐतिहासिक घटनेच्या शताब्दी वर्षानिमित्त पाण्याने पेटला वणवा हे ऐतिहासिक मराठी नाटक मंगळवार २३ जून रोजी रंगभूमीवर येणार आहे. यशवंतराव नाट्यमंदिर माटुंगा येथे रात्रौ ८.००वा. या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग रंगणार आहे. 'इतिहास केवळ स्मरणात ठेवण्यासाठी नसतो, तर त्यातून वर्तमानाला दिशा मिळावी यासाठी असतो. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचा विचार आणि त्यामागील सामाजिक जाणीव नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने हे नाटक साकारल्याचे लेखक राजकुमार बडोले यांनी सांगितले. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा केवळ इतिहासातील एक प्रसंग नसून सामाजिक न्यायाच्या लढ्याचे प्रेरणास्थान आहे.

पाण्याने पेटला वणवा च्या माध्यमातून त्या संघर्षाची तीव्रता आणि त्याचा आजच्या समाजाशी असलेला संबंध प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न आम्ही केल्याचे दिग्दर्शक प्रशांत निगडे सांगतात. युगंधर क्रिएशन्स एल.एल.पी. प्रस्तुत 'पाण्याने पेटला वणवा' या नाटकाची निर्मिती शारदा राजकुमार बडोले यांनी केली असून गणेश कृ. मोडक हे सहनिर्माते आहेत. नाटकाचे लेखन आणि गीतरचना आमदार तथा महाराष्ट्राचे माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या आहेत. दिग्दर्शन प्रशांत निगडे यांनी केले आहे. मंदार देशपांडे यांनी संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. तसेच वेशभूषा सुप्रिया बर्वे, रंगभूषा मिलिंद कोचरेकर, नेपथ्य सुशील पांचाळ आणि मंडळी यांनी केले आहे. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे यात दोन कालखंडांचा प्रभावी संगम घडविण्यात आला आहे. एका बाजूला महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचा इतिहास उलगडत जातो, तर दुसऱ्या बाजूला त्या इतिहासाकडे पाहणारी आजची पिढी दिसते. शंभर वर्षांपूर्वीच्या संघर्षाचा अर्थ आजच्या समाजासाठी काय आहे, हा महत्त्वपूर्ण प्रश्न हे नाटक प्रेक्षकांसमोर उभा करते.

या नाटकात सशांक पांचाळ, मयुरेश मढवी, मयुरी निकम, तेजस राजे, राजू भिलारे, अजित रांजणे, दत्ता शेट्ये, अमोल जाधव, सुबोध हर्डीकर, सायली नंदा, प्रांजल परब, महादेव जाधव, मृणाल खिस्मतवार, प्रेम जेटीथोर, संजना, हे कलाकार विविध भूमिका साकारणार आहेत.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

# श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण थाटात संपन्न

दिनांक ११ जून २०२६ रोज गुरूवारला जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवाराच्या वतीने जैन कलार समाज भवन, रेशिमबाग नागपूर येथे अधिक ज्येष्ठ मास/ पुरुषोत्तम मासातील कमला एकादशी या अमृत पर्वाचे औचित्य साधून श्री गजानन विजय ग्रंथाचे २१ अध्यायाचे भव्य सामूहिक पारायण आयोजित करण्यात आले होते. सोबतच श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या हरिपाठाचे पठण करण्यात आले.त्याचप्रमाणे श्रीसंत गजानन महाराजांच्या बावन्नी याचेही पठण करण्यात आले.याप्रसंगी संपूर्ण जैन कलार समाज भवन श्रीसंत गजानन महाराजांच्या कार्यक्रमाने दुमदुमला व संपूर्ण भक्तगण गजानन महाराजांच्या या कार्यक्रमांत तल्लीन झाले होते.या कार्यक्रमात गजानन महाराजांच्या भक्तांनी शेगावची प्रतिभुती अनुभवली व जनुकाय नागपूरात शेगाव अवतरल्याचे



भक्तांना वाटु लागले. या कार्यक्रमाची रूपरेषा श्री चंद्रशेखर छत्रपाल व त्यांच्या मंडळींनी आखली व कार्यक्रम तब्बल ४ तास चालला. यानंतर या कार्यक्रमाला साथ दिली भक्तीमय संगीताच्या माध्यमातून राकेश मासुरकर व त्यांच्या टीमने भरगच्च भक्ती गीत गायले. याप्रसंगी आरोग्य शिबीराचे सुध्दा आयोजन करण्यात आले होते.अशा प्रकारे हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजेपासून १० वाजेपर्यंत चालला याप्रसंगी भव्य महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात आले होते.संपुर्ण भक्तांनी महाप्रसादाचा आनंदाने स्वाद घेतला.या कार्यक्रमाचे आयोजन जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवारातर्फे करण्यात आले होते.आयोजकांनी मोठे परिश्रम घेऊन कार्यक्रमाची रूपरेषा आखली व गजानन महाराजांच्या कृपेने हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी झाला आयोजकामध्ये प्रामुख्याने जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष अनिलजी तिडके, प्रमोद पलांदुरकर, राजेश पलांदुरकर, अशोक भदाडे, मंगेश खाणोरकर, अक्षय तिडके, काशिनाथ ठवरे, अनिल भांडारकर, प्रकार भांडारकर, सुधीर फटींग,सागर खाणोरकर, गंगाधर शनिवारे, भुषण दडवे, विजय दहिकर,दिलीप गुणरकर, सचिन दहिकर, स्वप्नील रहाटे, मधुकर दहिकर, रमेश लांजेवार, राकेश मासुरकर, मनोहर धाबेकर, दिवाकर खाणोरकर, विजय वारजुरकर, पंकज दहिकर,मनोज अहिरकर,जामुवंत मासुरकर, राजेश मोरघडे,पारस मोरघडे इत्यादींसह अनेकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य केले.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविक प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल संपूर्ण भक्तगणांचे जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवारातर्फे राजेश पलांदुरकर यांनी सर्वांचे आभार मानले.

**रमेश लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# दैठना खुर्दच्या गोविंद बाबर यांची पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड



**दैठना –प्रतिनिधी**

दैठना खुर्द (ता. परतूर) येथील गोविंद विठ्ठलराव बाबर यांची नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशाबद्दल गावात आनंदाचे वातावरण असून, युवकांसाठी ते प्रेरणादायी ठरले आहेत.सत्कार कार्यक्रमास गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशेष मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा

**छत्रपती संभाजी नगर - प्रतिनिधी**

आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने १४ जून २०२६, रविवार ला दुपारी २:३० वाजता, संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे '' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ जून १९५० ला औरंगाबाद येथे मिलिंद व २० जून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली होती, त्याचे ऐतिहासिक महत्व.'' या ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर महाविद्यालय स्थापनेच्या वर्धापनदिनानिमित्त सामाजिक जनजागृतीच्या अनुषंगाने १७५ व्या मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला चळवळीचे कार्यकर्ते लॉ ऑफिसर ॲड. राजू बागुल हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार असून डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. शिवम गायकवाड हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८, ९८२२७७१९१९, ८६०५४०२२१४. या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# पत्रकारांवरील हल्ल्याप्रकरणी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार- आ. खोतकर

**जालना –प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात पत्रकारांवर झालेल्या हल्ल्यांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे अर्जुनराव खोतकर , बबनराव लोणीकर आणि संतोष दानवे माजी नगराध्यक्ष भास्करराव आबेकर यांची एकत्रित बैठक संपन्न झाली. या बैठकीत पत्रकारांवरील हल्ल्यांच्या घटनांचा निषेध करण्यात आला तसेच संबंधित प्रकरणांमध्ये कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव



खोतकर यांनी सांगितले की, जालना येथे पत्रकार राहुल मुळे यांना घाणेवाडी वॉटर पार्क परिसरात तब्बल पाच तास बांधून ठेवत मारहाण करण्यात आल्याची घटना अत्यंत गंभीर आहे. तसेच पत्रकार संतोष भुतेकर यांना ''बातम्या बंद कर, अन्यथा गोळ्या घालू'' अशी धमकी देत अज्ञात व्यक्तींनी हल्ला केल्याचा प्रकारही चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.पत्रकारांवरील वाढते हल्ले आणि जिल्ह्यात वाढत चाललेली गुन्हेगारी लक्षात घेता, लवकरच जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न व संबंधित घटनांबाबतची भूमिका मांडण्यात येणार असल्याची माहिती आमदार खोतकर यांनी दिली.बैठकीस माजी नगराध्यक्ष भास्कर आंबेकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व नेत्यांनी पत्रकारांवरील हल्ल्यांचा जाहीर निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांच्यावर होणारे हल्ले सहन केले जाणार नाहीत, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला.

# कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्वमहत्वाचे..?

...भारतीय राजकीय इतिहासात दीर्घकाळ देशाचे नेतृत्व करणारे आणि जनमानसावर स्वतःचा अमिट प्रभाव पाडणारे नेते कमी नाहीत. आधुनिक भारताच्या इतिहासात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर नरेंद्र मोदी हे असे नेते ठरले आहेत, ज्यांनी लागोपाठ तीनवेळा सार्वत्रिक निवडणुका जिंकून देशाचे नेतृत्व केले आहे. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाची १२ वर्षे पूर्ण होत असताना, त्यांची तुलना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकाळाशी केली जात आहे. पंडित नेहरू यांनी तीन निवडणुकांमध्ये विजय मिळवला होता, तर १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी अंतरिम पंतप्रधानपद सांभाळलेले होते. तीन सार्वत्रिक निवडणुकांचा विजय आणि पहिल्या निवडणुकीपूर्वी अंतरिम पंतप्रधान असे १७वर्षे ते देशाचे पंतप्रधान राहिले. त्यातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या कार्यकाळाची बरोबरी नरेंद्र मोदींनी केली आहे. कार्यकाळाची बरोबरी केल्यामुळे दोन नेत्यांची तुलना होऊ शकत नाही. कारण दोन्ही नेत्यांचा काळ, विचारसरणी आणि आव्हाने पूर्णपणे वेगळी होती. पंडित नेहरूंनी भारताच्या जडणघडणीत आणि जागतिक प्रतिमेत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. जवाहरलाल नेहरू यांचा वैचारिक पाया समाजवादी होता. ते राजकीय तत्वज्ञानपंडित होते. पंडित नेहरूंचा दृष्टिकोन लोकशाही समाजवाद धर्मनिरपेक्षता आणि अलिप्ततावाद यावर आधारित होता.

फाळणीच्या दुःखातून बाहेर पडणाऱ्या देशाला एकत्र बांधून ठेवणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. मोदींचे नेतृत्व सांस्कृतिक राष्ट्रवाद, मजबूत अंतर्भाव उदाहरणार्थ सबका साथ, सबका विकास अशा घोषणा आणि उजव्या विचारसरणीवर आधारित आहे. नेहरूंच्या समाजवादाच्या जागी मोदींनी कल्याणकारी भांडवलशाही आणि थेट लाभ हस्तांतरण यावर भर दिला. आर्थिक धोरणे आणि पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या काळात नेहरूंनी पंतप्रधानपद सांभाळले. स्वातंत्र्यानंतर देशात सुई-टाचणीही तयार होत नव्हती. अशा वेळी नेहरूंनी आयआयटी, आयआयएम, इस्रोची पार्श्वभूमी तयार केली होती, आणि भाक्रा नांगलसारखी मोठी धरणे उभारली. यातून



देशाच्या हरितक्रांतीचा पाया रचला गेला. त्यांनी या प्रकल्पांना ''आधुनिक भारताची मंदिरे'' म्हटले. मोदींच्या १२ वर्षांच्या काळात अशी कोणती मंदिरे उभी करण्यात आली. पंडित नेहरूंचा भर उद्योग उभारणे आणि उद्योग सरकारी नियंत्रणाखाली आणणे होता. मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारत सरकारच्या निर्गुतवणूक आणि खासगीकरण धोरणात मोठा बदल करण्यात आला. या काळात सरकारने धोरणात्मक निर्गुतवणुकीवर भर दिला, ज्याचा अर्थ केवळ शेअर्स विकणे नाही, तर कंपनीचे व्यवस्थापन आणि मालकी पूर्णपणे खासगी हातात सोपवण्यात आली. भारताने रस्ते, महामार्ग, विमानतळ आणि वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वेचे जाळे विस्तारले. भारत जगातील ११ व्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेतून ५ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला. मात्र हा मान फार काळ ते टिकवू शकले नाहीत. आता भारताची पुन्हा घसरण झाली. डॉलरच्या तुनलेत रुपया शंभरी पार करताना याच काळात दिसणार अशी स्थिती आहे. परराष्ट्र धोरणात नेहरू काळात जगाचे लक्ष भारताकडे राहात होते. अलिप्ततावादी चळवळ आणि पंचशील तत्वे भारताने स्वीकारली होती. मोदींच्या काळात आता देशाने बहु-आघाडीय धोरण आणि राष्ट्रीय हित सर्वोपरी तत्व स्वीकारले. मोर्दी समर्थक आणि भाजप नेत्यांकडून मोदींच्या काळात देशाचा ग्लोबल आवाज आणि मजबूत आर्थिक शक्ती म्हणून उदय होत असल्याचा दावा करण्यात येतो. नेहरूंच्या काळात गरिबी निर्मूलनासाठी मोठ्या योजनांपेक्षा संस्थात्मक उभारणीवर भर देण्यात आला होता. प्रशासकीय कारभार मजबूत करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पंडित नेहरूंनी या देशाचा पाया रचला त्यावर त्यांच्या नंतर येणाऱ्या सर्वच पंतप्रधानांनी देशाला मजबूतपणे उभे करण्याचे काम केले आहे. यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंह राव, डॉ. मनमोहन सिंह या सर्व पंतप्रधानांनी आपापल्या काळात देशाला विकासाच्या वाटेवर आणि आर्थिक आघाडीवर नेत जागतिक राजकारणात वेगळी छाप निर्माण केली. राजीव गांधी यांनी नवतंत्रज्ञानावर त्यांच्या काळात भर दिला, त्यामुळेच आज आपण डिजिटल इंडिया म्हणून मिरवत आहोत.

नरसिंह राव पंतप्रधान आणि डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असतानाच्या काळात देशाने आर्थिक उदारीकरणाचा निर्णय घेऊन जागतिक स्पर्धेत देशाला पोहचवले. १९९० च्या दशकात भारताच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीवर या जोडगोळीने मात केली. भविष्यातील महासत्तेचा पायाही रचला. लोकशाही संस्था आणि नेतृत्व शैली संसदीय लोकशाहीचा विचार केला तर पंडित नेहरू हे संसदेतील चर्चेला आणि विरोधकांच्या मताला प्रचंड मान देत असत. त्यांच्या काळात संस्थांना स्वायत्तता दिली गेली. तर मोदींचे नेतृत्व हे अधिक केंद्रीभूत मानले जाते, जिथे निर्णय घेण्याची गती एका व्यक्तीकडे केंद्रित झालेली. मोदींच्या १२ वर्षांत अनेक धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेतले गेले, जसे की कलम ३७० रद्द करणे, राम मंदिर निर्माण, जीएसटी लागू करणे. नेहरूंच्या काळात राज्यांची पुनर्रचना आणि हिंदू कोड बिल हे ऐतिहासिक निर्णय होते.

मोदींच्या कार्यकाळात बेरोजगारी, वाढती महागाई आणि सामाजिक ध्रुवीकरण या मुद्द्यांवर विरोधकांकडून सातत्याने टीका केली जाते. पंडित नेहरू हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते, ज्यांनी लोकशाहीचा पाया रचला आणि देशाला संस्थात्मक रूप दिले. टीकेलाही सकारात्मक घेतले. वय देशाचे, देशाच्या स्वातंत्र्याचे वाढतच जाणार आहे. या संपूर्ण काळात नवनवीन पंतप्रधान येत राहतील, कोण किती काळ सत्तेत होतं याची आकडेमोड करण्यापेक्षा कोणाच्या काळात देशाचा, नागरिकांचा किती विकास झाला, याची इतिहास नोंद घेत असतो. कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्व कसे राहिले याची नोंद इतिहास नक्कीच घेईल.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

# उन्हाची दाहकता पाहता शाळा सकाळ सत्रात घ्या : अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची मागणी

**दत्ता देशमुख**

यावर्षी पावसाळा लांबल्याने उन्हाची दाहकता व तीव्रता कायम आहे. त्यामुळे जिल्ह्यात १५ जून पासून सुरू होणाऱ्या सर्व शाळा सकाळ सत्रात भरवाव्यात अशी मागणी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाने लेखी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत शिक्षण अधिकाऱ्यांना शुक्रवारी दिलेल्या लेखी निवेदनात संघटनेने म्हटले आहे की सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात असून



तापमानात लक्षनीय वाढ झालेली आहे. तसेच ग्रामीण भागात पाणी टंचाई चा प्रश्न देखील आहे. अशावेळी विध्यार्थ्यांना उष्माघात, निर्जलिकरण तसेच आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून १५ जून ते ३० जून पर्यंत शाळेचे वेळापत्रक सकाळ सत्रात ठेवावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष डॉ.रविंद्र काकडे, जिल्हा युवा नेता जितेंद्र कांबळे, जालना तालुकाध्यक्ष गौतम गवई, जिल्हा उपाध्यक्ष विजय सदावर्ते, युवराज पढिभार, संदीप गवई, सतिश बोर्डे,किरण साळवे, सुनील भालतिलक, भानुदास लोखंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. हे निवेदन प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले असून निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आदींना पाठविण्यात आल्या आहेत. चौकट - उन्हाच्या *(पान २ वर)*

# देळेगव्हाण ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वार्डनिहाय आरक्षण सोडत झाली जाहीर

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीतील चारही वाडांतील सदस्य पदांसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने आरक्षण प्रक्रिया पार पडली.

जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार वार्ड क्र. १ मध्ये एक जागा अनुसूचित जाती महिला, एक



जागा सर्वसाधारण व एक जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. वार्ड क्र. २ मध्ये एक जागा सर्वसाधारण महिला, एक जागा नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी आरक्षित करण्यात आली आहे. वार्ड क्र. ३ मध्ये एक जागा मागास प्रवर्ग महिला, एक जागा अनुसूचित जाती महिला व एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. वार्ड क्र. ४ मध्ये एक जागा सर्वसाधारण, एक जागा सर्वसाधारण महिला आणि एक जागा एससी प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आली आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर संभाव्य इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली असून मतदारांशी संपर्क वाढविण्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही आरक्षण प्रक्रिया उपतालुका कृषी अधिकारी रणजित राजपूत, ग्राम महसूल अधिकारी एन. एच. पठाण आणि ग्राम विकास अधिकारी एस. बी. शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली.

## डॉ.सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालयाचे विद्यापीठाच्या परीक्षेत यश

**जालना - प्रतिनिधी**

जालना : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी सत्र परीक्षेत रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी एल एल बी परीक्षेत गुणवत्तेने उत्तीर्ण झाले असून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान भूमिका दामोदर राऊत या विद्यार्थिनीला मिळाला.द्वितीय क्रमांक शीतल पुरुषोत्तम शर्मा या विद्यार्थिनीने मिळवला तसेच गायत्री गजानन रावेरकर या विद्यार्थिनीचा तृतीय क्रमांक आला आहे.अनुजा सुधाकर निकाळजे व सय्यद वसिमोद्दीन हे विद्यार्थी ए प्लस ग्रेड मिळवून गुणवत्तेने उत्तीर्ण झाले.महाविद्यालयाचे ३६ विद्यार्थी ए ग्रेड ने उत्तीर्ण झाले,४६ विद्यार्थ्यांना बी प्लस ग्रेड मिळाला, २१ विद्यार्थ्यांना बी ग्रेड मिळाला आहे.महाविद्यालयाचा एकूण निकाल ७८.४६ % लागला



आहे.याबद्दल संस्थेच्या अध्यक्ष डॉ.प्रीती वारे,सचिव शिलाताई खेडकर, उपाध्यक्ष मा.सुनील मुंडे, सहसचिव ॲड.गजानन मांटे, माजी गटविकास अधिकारी बाबुराव गुंजकर, प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून प्र.प्राचार्य क्रांतिलक्ष्मी मुदिराज,परीक्षा विभाग प्रमुख डॉ.पवन खरात, प्रा.सुभाष बोर्डे, प्रा.सचिन निसर्गन, प्रा.मेघना त्रिभुवन, प्रा. संदेश तुपे, प्रा.प्रतीक्षा सावजी व ग्रंथपाल सौरभ बनछोड, अधीक्षक श्री.अमोल ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# विमान कंपनीचा निष्काळजीपणा प्रवाशांना भोवला

### ग्राहक आयोगाकडून ५० हजारांची भरपाई, वेळेपूर्वी विमान उडवल्याने प्रवासी विमानतळावर अडकले

**चंदीगड - प्रतिनिधी**

चंदीगड येथील राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने टाटा एसआयए एअरलाइन्स लिमिटेड विरुद्ध एका महत्त्वपूर्ण निकालात, आंतरराष्ट्रीय विमान प्रवासाची वेळ प्रवाशांना पूर्वसूचना न देता बदलल्यामुळे झालेल्या त्रासाबद्दल नुकसान भरपाईत वाढ केली आहे. आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती राज शेखर अत्री आणि सदस्य प्रीतिंदर सिंग यांनी स्पष्ट केले की, ग्राहकांना मिळणारी भरपाई ही त्यांना झालेल्या गैरसोयी, मानसिक त्रास आणि दुःखाची यथार्थवादी दखल घेणारी असावी. तसेच, सेवा पुरवठा दारांच्या निष्काळजीपणाला आळा घालणारी असावी. या प्रकरणात, तक्रारदारांनी चंदीगड ते दिल्ली आणि दिल्ली ते डेन्पासार (बाली) साठी टाटा एसआयए एअरलाइन्सची तिकिटे आरक्षित केली होती.

प्रवासाच्या नियोजित परतीच्या दिवशी, २ एप्रिल २०२४ रोजी, जेव्हा तक्रारदार डेन्पासार विमानतळावर पोहोचले, तेव्हा त्यांना धक्कादायक माहिती मिळाली. त्यांची नियोजित फ्लाईट कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आधीच निघून गेली होती. यामुळे त्यांना परदेशी विमानतळावर अडकून पडावे लागले आणि तब्बल ५१,००० रुपये खर्च करून नवीन तिकिटे खरेदी करावी लागली. या अनपेक्षित विलंबामुळे त्यांची दिल्ली ते चंदीगड ही कनेक्टिंग फ्लाईट देखील चुकली, ज्यामुळे त्यांना अतिरिक्त वाहतूक खर्चाचा भुर्दंड सोसावा लागला. या संपूर्ण प्रकरणी एअरलाइन कंपनीकडून कोणतीही मदत न मिळाल्याने आणि कायदेशीर नोटीस पाठवूनही दिलासा न मिळाल्याने त्यांनी चंदीगड जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली.

जिल्हा ग्राहक आयोगाने तक्रार अंशतः मान्य करत एअरलाइनला ५८,६४१ रुपये ९% व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. यासोबतच मानसिक त्रासासाठी ७,००० रुपये भरपाई देण्यास सांगितले. मात्र, मिळालेली भरपाईची रक्कम, खटल्याचा खर्च न मिळणे आणि व्याजाचा दर यावर असमाधानी असल्याने तक्रारदारांनी राज्य आयोगाकडे अपील दाखल केले. सुनावणी दरम्यान, टाटा एसआयए एअरलाइन्सने हे अपील फेटाळून लावण्याची मागणी केली आणि जिल्हा आयोगाचा निर्णय योग्य असल्याचे म्हटले.

राज्य आयोगाने सुनावणीअंती स्पष्ट केले की, फ्लाईटच्या वेळेत बदल करण्याची पूर्वसूचना देणे हे एअरलाइनचे मुलभूत कर्तव्य आहे आणि यात कंपनीने गंभीर चूक केली आहे. परदेशी भूमीवर प्रवाशांना कोणत्याही मदतीशिवाय सोडून देणे आणि त्यांना जास्त दराने नवीन तिकिटे खरेदी करण्यास भाग पाडणे, हे सेवेतील त्रुटीचे गंभीर उदाहरण आहे. आयोगाने जिल्हा आयोगाने दिलेली ७,००० रुपयांची भरपाई अत्यंत अपुरी असल्याचे निरीक्षण नोंदवले. आयोगाच्या मते, भरपाईची रक्कम प्रवाशांना झालेल्या त्रासाच्या प्रमाणात असावी आणि भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी सेवा पुरवठादारांवर वचक ठेवणारी असावी. *(पान २ वर)*

## निकृष्ट रस्त्याचा उत्कृष्ट नमुना ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे पुलावर पडलेल्या खड्ड्यामुळे टँक्टर पलटी



**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी डावरगाव देवी रोडच्या निकृष्ट रोडच्या कामामुळे जागोजागी खड्डे पडल्याने टँक्टर पलटी झाले सदरील रोडचे काम जवळपास सहा महिन्या पासून सुरु आहे कधी रोडवर चुना टाकल्या जातो तर कधी खडी यामुळे संबंधित गुत्तेदार यांनी वेळ काढू धोरण सुरू केलेल्या अनेकदा या रोडवर आपघात घडले तरीसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी याकडे काना डोळा करत आहेत अशी तक्रार प्रताप नवले यांनी नुकतीच केली होती आज तारीख १२ जून रोजी खाजगी पाणी पुरवठा करणारे टँक्टर सदरील पुलावर मोठे मोठाले खडे पडलेले असल्याने पलटी झाले आहे याकडे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसापूर्वी प्रताप नवले यांनी या मतदार संघातील आमदार संतोष रावसाहेब दानवे यांना सविस्तर माहिती दिली परंतु गुत्तेदार याकडे दुर्लक्ष करून अजून किती क होण्याची वाट बघातात अशा तक्रारी यारोडवरील ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

# इंदापूर(तळाशेत) बाजारात लोकांना हिवताप जनजागृती अभियान अंतर्गत आरोग्य शिक्षण

**बोरघर / माणगांव - विश्वास गायकवाड**

शुक्रवार दिनांक १२/६/२०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर अंतर्गत कॅलेंडर ॲक्टिव्हिटी मलेरिया २०२६ मा. जिल्हा हिवताप अधिकारी साहेब जिल्हा हिवताप कार्यालय रायगड यांच्या पत्रानुसार दिनांक १/६/२०२६ ते ३०/६/२०२६ पर्यंत दरवर्षी हिवताप जनजागृती करण्यात येत असते, सदर वेळी हिवताप जनजागृती इंदापूर बाजार पेठ मध्ये हिवताप जनजागृती करण्यात आली.सदरवेळी प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथील श्री.सुधीर गणपत खैरे आरोग्य



सेवक रातवड उपस्थित राहून तेथील लोकांना आरोग्य शिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. सदर वेळी हिवताप हा अनाफिलीस डासांच्या मादी चावल्यामुळे होतो हि डासांची मादी स्वच्छ पाण्यात अंडी घालते डासांच्या चार अवस्था अड़ी, आळी, कोष,व पुर्ण डास अशी माहिती देण्यात आली. व तेथील लोकांना आरोग्य शिक्षण देण्यात आले सदर हिवतापाची लक्षणे थंडी वाजून ताप येतो, डोकेदुखी, ताप, सांधेदुखी, अंगदुखी, अशी लक्षणे दिसतात. कधी कधी अनियमित ताप असतो, सदर वेळी येता कण कण तापाची,करा तपासणी रक्ताची. गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा. कोणताही ताप अशु शकतो हिवताप. मच्छर दाणीचा वापर करावा,आपले परिसर स्वच्छ ठेवणे. तसेच ताप आला तर प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथे जाऊन तपासणी करून औषध उपचार घ्यावे आदी. आरोग्य शिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले.तसेच पाण्याची भांडी झाकून पुसून कोरडे करून पुन्हा पाणी भरून कोरडा दिवस पाळणे, रांजन, हौद पिंप टाक्या डबे बादली बाटली नारळाच्या करवंटी, फुलदाणी, कुंड्या यांमध्ये उत्पत्ती होते. पाण्याची, साठे झाकून ठेवावे परिसर स्वच्छ ठेवा. फवारणी कार्यक्रम मध्ये सहभागी व्हा,व सहकार्य करावे. लोक सहभाग वाढवावा. अशी जनजागृती मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.

# शेख मोहसीन मजीत हत्या प्रकरणात, आरोपींना फाशीची शिक्षा द्या ; जाफराबादेत नागरिकांचा मोर्चा

**दत्ता देशमुख**

जाफराबाद येथील येथील मिरची व्यापारी शेख मोहसीन मजीद यांच्या निघृण हत्येप्रकरणी आरोपींना फाशीची शक्षिा देण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवारी शहरात निषेध मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाला व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाला.

बंदच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली. त्यामुळे शहरात कडकडीत बंद



पाळण्यात आला. डॉ. फयेज चौकातून मोर्चाला सुरुवात होऊन तहसील कार्यालयावर धडक देण्यात आली. यावेळी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने तहसीलदार लोंढे यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात म्हटले आहे की, शेख मोहसीन मजीद हत्या प्रकरणाचा तपास तातडीने पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी,

**मोर्चात होता यांचा सहभाग**

या मोर्चात ॲड. विनोद श्रीराम डिगे, नगराध्यक्ष दीपक पाटील वाकडे, उपनगराध्यक्ष रऊफ चेअरमन, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रामधन पाटील कळंबे, नगरसेवक सुरेश दिवटे, नगरसेवक अनिल बोर्डे, तालेब, मुजिब, मोईन खान पठाण, शेख अश्पाक, ॲड. सादिक अलीम, हाफिज शेख जहूर, शेख इरफान, शेख रिजवान, सुरेश गवळी, अमोल पडघन, सलमान पठाण, रशीद कुरेशी, शेख हुजेर, शेख इस्माईल, नजीर खान यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक सहभागी झाले होते. मोर्चाच्या माध्यमातून जाफराबादकरांनी *(पान २ वर)*

# नवचैतन्याची नवी पहाटः नवीन शैक्षणिक वर्षास सामोरे जाताना...

१५ जून, सोमवार! उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपून आता पुन्हा एकदा शाळेची घंटा वाजणार आहे. किलबिलाट, नवीन पुस्तकांचा सुवास, नवीन वह्यांची कोरी पाने आणि स्वप्नांचे नवे आकाश घेऊन ''नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७*'' सोमवार पासून सुरू होत आहे. या उत्साही आणि महत्त्वपूर्ण प्रसंगी माझ्या तमाम लाडक्या विद्यार्थी मित्रांना आणि आदरणीय शिक्षक बंधू-भगिनींना नवीन शैक्षणिक वर्षाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

विद्यार्थी मित्रांसाठीः स्वप्नांना पंख देण्याची वेळ

लाडक्या विद्यार्थ्यांनो, नवीन वर्ष म्हणजे एक कोरी वही आणि नवीन संधी! गेल्या वर्षी काय घडले, किती गुण मिळाले यापेक्षा या वर्षी आपण काय नवीन शिकणार आहोत, हे महत्त्वाचे आहे.

ध्येय निश्चित कराः वर्षाच्या पहिल्याच दिवसापासून आपले ध्येय निश्चित करा. अभ्यास केवळ परीक्षेसाठी नाही, तर ज्ञानासाठी करा.

जिज्ञासू वृत्ती ठेवाः मनात येणारे प्रश्न शिक्षकांना विचारण्यास कधीही संकोच करू नका. प्रश्न विचारणारा विद्यार्थीच खरा ज्ञानार्थी असतो.

अष्टपैलू बनाः अभ्यासासोबतच खेळ, कला, वक्तृत्व आणि सामाजिक उपक्रमांमध्येही हिररीने भाग घ्या.

तुम्ही घेतलेले प्रत्येक छोटे पाऊल उद्या तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाणार आहे. स्वतःवर विश्वास ठेवा



आणि जिद्दीने अभ्यासाला लागा!

आदरणीय शिक्षकांसाठीः राष्ट्रनिर्मितीचे शिल्पकार शिक्षकी पेशा ही केवळ एक नोकरी नाही, तर ते एक व्रत आहे. वर्गखोलीत बसलेला प्रत्येक विद्यार्थी हा देशाचे भविष्य असतो आणि त्या भविष्याला आकार देण्याचे महान कार्य आपले शिक्षक करत असतात.

बदलत्या काळाचे आव्हानः आजचे युग हे डिजिटल आणि तंत्रज्ञानाचे युग आहे.

या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्यात नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणः प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती वेगळी असते. एकही मूल मागे पडणार नाही या भूमिकेतून, आपल्या कौशल्याचा वापर करून शिक्षण अधिक रंजक आणि प्रभावी बनवणे हेच आपले मुख्य ध्येय असावे. आपल्या अविरत कष्टांमुळेच उद्याचे आदर्श नागरिक, डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ आणि संवेदनशील समाजसेवक घडणार आहेत.

तुमच्या या पवित्र कार्याला माझा मानाचा मुजरा!

**शाळा, समाज आणि नवे संकल्प**

शिक्षण ही एक सामूहिक प्रक्रिया आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तीन स्तंभांवर शिक्षणाचा डोलारा उभा असतो. या नवीन वर्षात आपण सर्वांनी मिळून शाळांचे वातावरण अधिक आनंदी, समृद्ध आणि गुणवत्तापूर्ण बनवण्याचा संकल्प करूया. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणे आणि दर्जेदार शिक्षण देणे हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

पुन्हा एकदा, १५ जून पासून सुरू होणाऱ्या या नवीन शैक्षणिक प्रवासासाठी सर्व विद्यार्थ्यांना उज्वल यशाच्या आणि सर्व शिक्षकांना ऊर्जादायी अध्यापनाच्या मनापासून शुभेच्छा!

हे वर्ष आपल्या सर्वांच्या आयुष्यात प्रगतीचे, आनंदाचे आणि यशाचे ठरो, हीच सदिच्छा!

''चला, समृद्ध आणि सुजाण पिढी घडवण्यासाठी एकत्र पाऊल टाकूया!''

**शेख अब्दुल रहीम,**
**संस्थापक अध्यक्षः हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**
**सह-शिक्षकः चौधरी शेख मन्नाबी उर्दू प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.